## MAHARASHTRA ACT No. XV OF 1980

## THE MAHARASHTRA (CHANGE OF SHORT TITLES OF CERTAIN BOMBAY ACTS) ACT, 1980.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती, दिनांक ६ ऑगस्ट १९८० रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एस. ए. धोत्रे,
सचिव, महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XV OF 1980

## AN ACT TO AMEND CERTAIN ENACTMENTS TO CHANGE THEIR SHORT TITLES FROM " BOMBAY ACTS " TO " MAHARASHTRA ACTS ".

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक ७ ऑगस्ट १९८० रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

## सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५

**विवक्षित अधिनियमांची संक्षिप्त नावे, " मुंबई अधिनियम " याऐवजी " महाराष्ट्र अधिनियम " असा बदल करण्याप्रीत्यर्थ त्यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, विवक्षित अधिनियमांचा भविष्यकाळात अधिक योग्य संक्षिप्त नावाद्वारे उल्लेख करणे सुकर होण्यासाठी आणि विद्यमान महाराष्ट्र राज्यास ते लागू असल्याचे विशद करण्यासाठी, त्यांच्या संक्षिप्त नावात " मुंबई अधिनियम, " याऐवजी " महाराष्ट्र अधिनियम " असा बदल करण्याप्रीत्यर्थ आणि विवक्षित परिणामस्वरूप व आनुषंगिक तरतुदी करण्यासाठी, त्या अधिनियमांमध्ये सुधारणा करणे इष्ट आहे ;

त्याअर्थी, आता भारतीय गणराज्याच्या एकतिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास महाराष्ट्र (विवक्षित मुंबई अधिनियमांच्या संक्षिप्त नावात बदल करणे) अधिनियम, १९८० असे म्हणता येईल. **संक्षिप्त नाव.**

२. अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अधिनियमांमध्ये उक्त अनुसूचीच्या स्तंभ चारमध्ये त्यांच्यासमोर नमूद करण्यात आलेल्या मर्यादेपर्यंत आणि त्या रीतीने, याद्वारे, सुधारणा करण्यात येत आहे. **विवक्षित अधिनियमांची सुधारणा.**

**अधिनियम इत्यादींमधील किंवा लेखांमधील निर्देशांचा अन्वयार्थ लावणे.** ३. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, पुढील अनुसूचीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही अधिनियमांच्या संक्षिप्त नावाचा, इतर कोणत्याही अधिनियमामध्ये किंवा कोणत्याही अधिनियमान्वये काढण्यात आलेले कोणतेही नियम, विनियम, उप-विधी, अधिसूचना किंवा आदेश यांमध्ये किंवा कोणत्याही लेखांमध्ये आलेला कोणताही निर्देश हा, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, अनुसूचीच्या स्तंभ चारमध्ये सुधारण्यात आल्याप्रमाणे असलेला त्या अधिनियमांच्या संक्षिप्त नावाचा निर्देश असल्याचे मानण्यात येईल.

## अनुसूची

(भाग दोन पहा)

| वर्ष<br>१ | क्रमांक<br>२ | संक्षिप्त नाव<br>३ | सुधारणा<br>४ |
|---|---|---|---|
| १९५६ | ४६ | मुंबई आकस्मिकता निधी अधिनियम, १९५६. | कलम १ मध्ये "मुंबईचा आकस्मिकता निधी अधिनियम, १९५६" या मजकुराऐवजी "महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियम" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| १९५६ | ४७ | मुंबई विधानपरिषदेच्या सभापतीचे व उप-सभापतीचे व मुंबई विधानसभेच्या अध्यक्षाचे व उपाध्यक्षाचे पगार व भत्ते यांबाबत अधिनियम, १९५६. | (अ) पूर्ण नावामध्ये "मुंबई विधानपरिषदेच्या" व "मुंबई विधानसभेच्या" या मजकुराऐवजी, अनुक्रमे "महाराष्ट्र विधानपरिषदेच्या" आणि "महाराष्ट्र विधानसभेच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.<br>(ब) उद्देशिकेमध्ये, "मुंबई विधानपरिषदेच्या" आणि "मुंबई विधानसभेच्या" या मजकुराऐवजी अनुक्रमे, "महाराष्ट्र विधानपरिषदेच्या" आणि "महाराष्ट्र विधानसभेच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.<br>(क) कलम १ मध्ये, पोट-कलम (१) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—<br>"(१) या अधिनियमाला, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सभापतीचे व उप-सभापतीचे व महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षाचे व उपाध्यक्षाचे पगार व भत्ते यांबाबत अधिनियम, असे म्हणता येईल." |
| १९५६ | ४८ | मुंबई मंत्र्यांचे पगार व भत्ते यांबाबत अधिनियम, १९५६. | (अ) पूर्ण नावामधील "मुंबई सरकारच्या" या मजकुराऐवजी, "महाराष्ट्र शासनाच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.<br>(ब) उद्देशिकेमध्ये, "मुंबई सरकारच्या" या मजकुराऐवजी "महाराष्ट्र शासनाच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.<br>(क) कलम १ मध्ये, पोट-कलम (१) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—<br>"(१) या अधिनियमाला, महाराष्ट्र मंत्र्यांचे पगार व भत्ते यांबाबत अधिनियम, असे म्हणता येईल.". |

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| १९५६ | ४९ | मुंबई विधानमंडळाच्या सदस्यांचे पगार व भत्ते यांबाबत अधिनियम, १९५६. | (अ) पूर्ण नावामध्ये, "मुंबई विधानमंडळाच्या" या मजकुराऐवजी "महाराष्ट्र विधानमंडळाच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.<br>(ब) उद्देशिकेमध्ये, "मुंबई विधानमंडळाच्या" या मजकुराऐवजी, "महाराष्ट्र विधानमंडळाच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.<br>(क) कलम १ मध्ये पोट-कलम (१) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—<br>"(१) या अधिनियमाला, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे पगार व भत्ते यांबाबत अधिनियम, असे म्हणता येईल.". |
| १९५६ | ५२ | मुंबई विधानमंडळाच्या सदस्यांबाबत (अपात्रता दूर करण्याबाबत) अधिनियम, १९५६. | (अ) पूर्ण नावामध्ये, "मुंबई विधानसभा व मुंबई विधानपरिषद" या मजकुराऐवजी "महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधानपरिषद" हा मजकूर दाखल करण्यात येईल.<br>(ब) कलम १, मध्ये पोट-कलम (१) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—<br>"(१) या अधिनियमाला महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांबाबत (अपात्रता दूर करण्याबाबत) अधिनियम, असे म्हणता येईल.". |

(यथार्थ अनुवाद)

य. शं. कानिटकर,
भाषा संचालक व शासनाचे पदसिद्ध उप सचिव,
सामान्य प्रशासन विभाग.